असा. क्र. ७

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००१

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जानेवारी ५, २००१ /पौष १५, शके १९२२**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

# भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम**

## अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.—महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम .. .. | ३६-३८ |

दिनांक ४ जानेवारी २००१ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

## सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७.

(राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक ५ जानेवारी २००१ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

### महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी अधिनियम.

**ज्याअर्थी**, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी**, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, १९७१ चा महा.४७. संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ याची मुदत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १९ ऑक्टोबर २००० रोजी २००० चा महा. अध्या. २३. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, २००० हा प्रख्यापित केला होता;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या एकावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अधिनियम, २००० असे म्हणावे.

(२) तो दिनांक ३० जून २००० रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४७ याच्या कलम १ ची सुधारणा.

२. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) अधिनियम, १९७१ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा केला आहे), याच्या कलम १ मधील, पोट-कलम (४) मध्ये, " २००० " या आकड्यांऐवजी " २००१ " हे आकडे दाखल करण्यात येतील. १९७१ चा महा. ४७.

व्यावृत्ती.

३. कोणत्याही व्यक्तीने, दिनांक १ जुलै २००० रोजी सुरू होणाऱ्या आणि दिनांक १८ ऑक्टोबर २००० रोजी समाप्त होणाऱ्या कालावधीत केलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही कृती ही, या अधिनियमाद्वारे मुख्य अधिनियमाच्या मुदतीत भूतलक्षी प्रभावाने वाढ करण्यात आली नसती तर, अपराध ठरली नसती तर, त्याबाबतीत ती व्यक्ती, या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशा कृतीच्या किंवा अकृतीच्या संबंधातील कोणत्याही अपराधाबद्दल सिद्धापराध ठरवली जाण्यास पात्र असणार नाही.

शंका दूर करणे.

४. शंका दूर करण्याकरिता, याद्वारे, असे घोषित करण्यात येते की, दिनांक ३० जून २००० नंतर समाप्त होणाऱ्या मुख्य अधिनियमाची मुदत या अधिनियमाद्वारे, त्या दिनांकापासून दिनांक ३० जून २००१ हा दिनांक धरून त्या दिनांकापर्यंत भूतलक्षी प्रभावाने वाढविण्यात आल्यामुळे तो कोणत्याही वेळी समाप्त झालेला नव्हता असे मानण्यात येईल व या अधिनियमाद्वारे, सुधारण्यात व मुदत वाढविण्यात आल्याप्रमाणे असलेल्या, त्या अधिनियमाच्या सर्व तरतुदी या अधिनियमाच्या कलम ३ च्या तरतुदींच्या अधिनतेने अखंडपणे अमलात असल्याचे मानण्यात येईल.

सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २३ याचे निरसन व व्यावृत्ती.

२००० चा महा. अध्या. २३.

५. महाराष्ट्र कच्च्या कापसाबाबत (प्रापण, संस्करण व पणन) (भूतलक्षी प्रभावाने मुदत वाढविणे) अध्यादेश, २००० हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही (करण्यात आलेली कोणतीही नियुक्ती किंवा केलेला कोणताही नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये, यथास्थिति, करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही, करण्यात आलेली नियुक्ती किंवा केलेला नियम, काढलेला आदेश किंवा अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई